महाराष्ट्र शासन

क्रमांक : व्हीपीएम-२०२०/प्र.क्र.८३/पंरा.३

दूरध्वनी क्र.०२२-२२८३९९२४
ईमेल:-ananda.shendge@nic.in

ग्राम विकास विभाग
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई -४०० ००१,
दिनांक : ०३ मार्च, २०२०

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद ( सर्व ).

विषय:- ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विशेष भत्याचे (राहणीमान भत्ता) दर सुधारित करण्याबाबत.

महोदय/ महोदया,

कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, ई ब्लॉक, सी २०, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पू), मुंबई-४०० ०५१ यांचे दिनांक ५ ऑगस्ट, २०१९ व दि. ५ फेबुवारी, २०२० चा आदेश यासोबत जोडला आहे.

२. दि. ५ ऑगस्ट, २०१९ च्या आदेशात दिनांक ०१.०७.२०१९ ते दिनांक ३१.१२.२०१९ या कालावधीकरीता स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत) याखाली ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विशेष भत्याचे (राहणीमान भत्ता) दर परिगंज १, परिमंडळ २ व परिमंडळ-३ करीता प्रतिमहिना रु. ३७००/- (अक्षरी रुपये तीन हजार सातशे फक्त ) इतके सुधारित करण्यात आले आहेत. त्यास अनुसरून सदर विशेष भत्याचे । राहणीमान भत्ता ) सुधारित दर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना दिनांक ०१.०७.२०१९ ते दिनांक ३१.१२.२०१९ पर्यंत लागू करुन प्रतिमहा ग्रामनिधीतून देणे बंधनकारक आहे.

३. तसेच दि. ५ फेबुवारी, २०२० च्या आदेशात दिनांक ०१.०१.२०२० ते दिनांक ३०.०६.२०२० या कालावधीकरीता स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत) याखाली ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विशेष भत्याचे (राहणीमान भत्ता) दर परिगंज १, परिमंडळ २ व परिमंडळ-३ करीता प्रतिमहिना रु. ४०५०/- (अक्षरी रुपये चार हजार पन्नास फक्त ) इतके सुधारित करण्यात आले आहेत . त्यास अनुसरून सदर विशेष भत्याचे । राहणीमान भत्ता ) सुधारित दर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना दिनांक ०१.०१.२०२० पासून लागू करुन प्रतिमहा ग्रामनिधीतून देणे बंधनकारक आहे.

४. शासन पत्र क्र.व्हीपीएम-२०१०/प्र.क्र.३३९/पंरा-३. दि.१७ मार्च, २०१२ अन्वये " ज्या ग्रामपंचायती कामगार विभागाने निशित केलेल्या दराप्रमाणे किमान वेतन व राहणीमान भत्ता / विशेष भता देणार नाहीत अशा ग्रामपंचायतीच्या सरपंच व ग्रामसेवकावर कामगार कायद्यानुसार फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल . अशा सूचना सर्व ग्रामपंचायतींना देण्यात याव्यात व याप्रमाणे किमान वेतन व राहणीमान भत्ता /विशेष भत्ता देण्यात येईल हे पहावे " अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. ही बाब पुनश्च आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

५. त्यास अनुसरून ग्रामपंचायत कर्मचा-यांना दि. १ जुलै, २०१९ ते २८ फेब्रुवारी २०२० या कालावधीतील विशेष भत्ता / राहणीमान भत्ता उपरोक्त दराने त्वरित देण्यात येईल हे पहावे व पुढील महिन्यांचा विशेष भत्ता / राहणीमान भत्ता त्या त्या महिन्यात देण्यात यावा.

आपला,

(ए.का.गागरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:- कक्ष अधिकारी, उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned by CamScanner